**वाचले**- 1) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. गौखनि-10/0512/प्र.क्र. 300/ख दि. 12/03/2013

2) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग, पत्र क्र. गौखनि-10/0216/प्र.क्र. 158/ दि. 22/03/2016

3) म.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र क्र. मशा/कार्या.2/जमीन/5/ प्र.क्र. 7837/ 2017/जा.क्र.30085 दि. 23/02/2017

---

## जाहीरनामा

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक
क्र. कक्ष /15/गौखनि/ 56 /2017
नाशिक, दि. 6/03/2017

नाशिक जिल्यातील 04 वाळू घाटासाठी नव्याने पहिल्यांदा ई-लिलाव सन 2016-2017 करिता महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय दिनांक 12/03/2013 व 22/03/2016 नुसार दिनांक 30/09/2017 पर्यंतच्या मुदतीसाठी ई-ऑक्शनव्दारे (ई-लिलावव्दारे) रेती /वाळुची निर्गती करणेसाठी सविस्तर माहिती http://www.eauctioncollnsk.abcprocure.com या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्यात आली आहेत. इच्छुक कंत्राटदारांना रेतीघाट निर्गतीकरीता ई- ऑक्शन (ई-लिलाव) मध्ये भाग घेणे कामी उपरोक्त वेबसाईटवर (संकेतस्थळावर) ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. ई-ऑक्श्न डाऊनलोड करणेपूर्वी डिजीटल कि तयार करुन घेणे सर्व लिलावधारकांना बंधनकारक राहील.

ई-लिलावासाठी नाशिक जिल्हयाकरीता आय. सी. आय. सी. आय. बँक व ए. बी. सी. प्रोक्युअर या संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर संस्थेचा पत्ता मे. आय. सी. आय. सी. आय. बँक, राजीव गांधी भवन समोर नाशिक असा आहे. इच्छुक लिलावधारकांनी ई- लिलावा संबंधी तांत्रिक व सविस्तर माहिती घेणेकामी संस्थेचे संपर्क दुरध्वनी/ भ्रमणध्वणी क्रमांक- +91 79400 16 835/ 837/ 867/ 802/ 879/ 886/ 865/ 883/ 852/ 823/ 891 Email : support@abcprocure.com वर संपर्क साधण्यात यावा अधिक माहितीसाठी ICICI चे श्री. सुमंत जोशी मो. नं. 7875756600 व श्री. योगेश कोठावदे मो. नं. 7875758690 यांचेशी संपर्क साधावा.

नव्याने ई-ऑक्शन प्रक्रियेत भाग घेणा-या कंत्राटदारांनी ऑनलाईन नोंदणी (Registration) करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणी (Registration) साठी (संगणकीय नोंदणीकरीता) ई-मेल आयडी, पॅन कार्ड, टिन नंबर, मागील तीन वर्षाचे आयकर विवरण पत्रे, निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत 100 रुपयेचे स्टॅप पेपरवर हमी पत्र व अधिकृत संस्थेकडील डिजीटल सिग्नेचर (डिजीटल की) अनिवार्य आहे. रजिस्ट्रेशन व डिजीटल की याच्या अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्रमांक - 079 40016866 व + 919099090830 वर संपक साधावा. ई-मेल- info@abcprocure.com .

ई-ऑक्शनच्या डिजिटल कि बाबत मे. एनकोड सोल्युशन लि. नाशिक या संस्थेचे प्रतिनिधी श्री. परेश मो. नं. 9370116766 याचेशी संपर्क साधावा.

<u>ना-परतावा शुल्क फि (Fee)</u>

ई-निविदा कम ई- ऑक्शन प्रक्रियेत भाग घेऊ इच्छिणा-यास पुढील प्रमाणे ना-परतावा फी अदा कराव्या लागतील.

1. नोंदणी फी (फक्त एकदाच) - रुपये 2875/-
2. निविदा फॉर्म फी (प्रत्येक वाळु स्थळा करीता स्वतंत्र)- रुपये 2000/- (अपसेट प्राईज 10 लाखा पर्यंत असणा-या वाळु स्थळासाठी) रुपये 5000/- (अपसेट प्राईज 10 लाखा पेक्षा जास्त असणा-या वाळु स्थळासाठी)
3. निविदा प्रक्रीया फि (प्रत्येक वाळु स्थळा करीता स्वतंत्र) - रुपये 1553/- सदरहु रक्कम नेट बँकींग /क्रेडिट कार्ड /डेबिट कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने अदा करावी लागेल.

अटी व शर्तीनुसार ई- निविदा सोबत रेती घाट अपसेट प्राईजच्या (हातच्या किंमत) 20% रक्कम (EMD) सदर वर नमुद पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन (संगणकीय) जमा करावी लागेल. ज्या कंत्राटदारांनी ई- निवीदा ज्या रेतीघाटासाठी भरली असेल त्या रेतीघाटासाठी ई- ऑक्शन (ई-लिलाव) पध्दतीमध्ये भाग घेता येईल. रेतीघाट संबधीचा विस्तृत माहिती उपरोक्त नमुद वेबसाईटवर/ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

ई-ऑक्शन (ई-लिलाव) पध्दतीने रेती/वाळु निर्गती करणेसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

**<u>निविदा वेळापत्रक</u>**

| अ. क्र. | कार्यालयीन स्टेज | सुरुवात दिनांक व वेळ (पासुन) | अंतिम दिनांक व वेळ (पर्यंत) |
|---|---|---|---|
| 1 | ई- लिलाव सुचना प्रसिध्दी | 07/03/2017 सकाळी 10.00 | 07/03/2017 संध्या 18.00 |
| 2 | बीडर रजिस्ट्रेशन | 07/03/2017 सकाळी 10.00 | 09/03/2017 संध्या 18.00 |
| 3 | ऑनलाईन निविदा खरेदी व डाऊनलोड करणे | 07/03/2017 सकाळी 10.00 | 09/03/2017 संध्या 19.00 |
| 4 | ऑनलाईन निविदा भरणे (तांत्रिक) व (व्यापारी) | 07/03/2017 सकाळी 10.00 | 09/03/2017 संध्या 19.00 |
| 5 | तांत्रिक लिफाफा उघडणे | 10/03/2017 सकाळी 11.00 | 10/03/2017 दुपारी 13.00 |
| 6 | ई- लिलाव | 14/03/2017 सकाळी 11.00 | 14/03/2017 दुपारी 13.00 |

सर्वोच्च ई-ऑक्शन धारकास (ई-लिलाव धारकास) प्रतिज्ञापत्र, पॅन कार्ड, टिन क्रमांकाची प्रत, मागील तीन वर्षाचे आयकर विवरण पत्रे आणि कंपनी/ फर्म असल्यास रजिस्ट्रेशनची (नोंदणी) प्रत त्वरीत सादर करावी लागेल.

ई-ऑक्शन (ई-लिलाव) स्विकारणे किंवा नाकारणे तसेच तांत्रिक अडथळा निर्माण झाल्यास सदर कार्यवाही पुढे ढकलणे संबंधीचा अधिकार अपर जिल्हाधिकारी नाशिक / जिल्हाधिकारी नाशिक यांनी राखुन ठेवला आहे.

सदर लिलाव हे जिल्हा समितीच्या/प्राधिकरणाच्या पर्यावरण अनुमतीच्या अधीन राहुन करण्यात येत असून पर्यावरण अनुमती प्राप्त न होणा-या गटात उत्खननास कोणत्याही परिस्थितीत परवानगी देण्यात येणार नाही. तसेच पर्यावरण अनुमतीस उशीर झाला तरी सदरचे लिलाव हे दिनांक 30/09/2017 पर्यंतच्या कालवधी करीताच राहातील. ई- लिलाव करावयाच्या वाळुस्थळाचा तपशील प्रपत्र -अ मध्ये अटी / शर्ती प्रपत्र - ब मध्ये दर्शविलेला आहे.

**<u>प्रपत्र -अ एकुण 04 वाळुस्थळासाठी प्रथम ई- ऑक्शन लिलावाची यादी.</u>**

| अ.क्र. | वाळुस्थळा चे नांव | वाळुक्षेत्राचा तpपशिल | वाळु स्थळाचे क्षेत्र प्रत्यक्षात यंत्रणा यांनी सर्व्हेक्षण केल्यानंतर प्रस्तावित केलेले क्षेत्र लांबी/रुंदी/खोली (मीटर) | | | अंदाजीत वाळुसाठा (ब्रास) | उत्खननासाठी वापरावयाची साधने | सन 2016-2017 साठी निर्धारित केलेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लांबी | रुंदी | खोली | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| तालुका- नाशिक | | | | | | | | |
| 1 | लहवित | दारणा नदी पात्र ग.नं.127/2/ब, 168/1 व 171/1/1 | 400 | 10 | 0.50 | 707 | मानवी | 494900 |
| तालुका-~~निफाड~~ नाशिक. | | | | | | | | |
| 1 | माडसांगवी | गोदावरी नदी पात्र गट नं . 47 | 300 | 15 | 0.45 | 795 | मानवी | 556500 |
| तालुका-कळवण | | | | | | | | |
| 1 | गोसारणे | गिरणा नदी पात्र गट नं. 126,127, 128, 130,131,132,146, 147,148, 150,151 | 300 | 10 | 0.50 | 530 | मानवी | 379480 |
| तालुका- देवळा | | | | | | | | |
| 1 | लोहणेर | गिरणा नदी पात्र गट नं. 95, 96, 97, 98 | 310 | 30 | 0.50 | 1643 | मानवी | 2467786 |

सदरचे वाळू स्थळांना पर्यावरण विषयक अनूमती प्राप्त झालेली नाही यास्तव सदरचे वाळू घाटांचे लिलाव पर्यावरण विषयक अनुमतीचे अधीन राहून करण्यात येत आहे. पर्यावरण विषयक अनुमती ज्या वाळू घाटास प्राप्त न झाल्यास त्या वाळू घाटाचा लिलाव रद्य करण्यात येईल.